<u>नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००६ मधील निशाणी २४९ वरील आदेश</u>.

(CNR No-MHST-05-000322-2006)

१. प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र.९अ श्रीमती गंगुबाई हिंदूराव देवकर हया दिनांक २७/०४/२०१४ रोजी मयत झाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास उशिर झाल्याने उशिर माफीचा अर्ज दिलेला आहे.

२. वादी असे नमूद करतो की, मयत प्रतिवादी यांचे वारस यापूर्वीच दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामिल आहेत. त्यामुळे वादींना असे वाटले की, मयत प्रतिवादी क्र.९अ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची गरज नाही. त्यामुळे एकूण ८ वर्ष ९८ दिवसांचा उशिर झालेला आहे. सदरचा उशिर हा मुद्दाम केलेला नसून नजरचुकीने झालेला आहे. झालेला उशिर माफ न झाल्यास वादीचे मोठे नुकसान होईल म्हणून त्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावरती प्रतिवादी यांनी असा आक्षेप घेतला आहे की, उशिर हा फार मोठया काळाचा आहे. त्यामुळे जर अर्ज मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास वादीवर जादा खर्च आकारुन अर्ज मंजूर करण्यात यावा. प्रस्तुत प्रकरणात वादी यांनी मुळ मयताचे प्रमाणपत्र निशाणी २५८ च्या कागदयादीने दाखल केले आहे.

४. प्रस्तुत प्रकरणात वादीचे म्हणणे मयत प्रतिवादी क्र.९अ हिचे वारस पूर्वीच दाव्यात सामिल आहेत व त्यामुळे नजरचुकीने उशिर झाला आहे ही बाब लक्षात घेता तसेच झालेला उशिर हा खर्च आकारुन माफ करणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

१. अर्ज रक्कम रुपये २००/– खर्च आकारुन मंजूर करण्यात येत आहे.

कराड. ( श्रीमती एस.वाय.देशमुख )

दि.१३/१०/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड